ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC


# महिलांच्या मानव अधिकाराची वस्तुस्थिती आणि संवर्धन

डॉ. माणिक सोनवणे (राज्यशास्त्र विभाग)
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे)

जगात माणसा माणसामध्ये वांशिक, जात, भाषा, धर्म, स्त्री, पुरूष अशा भिन्न भिन्न प्रवृत्ती आढळून येतात तसे पहाता स्त्री पुरूष हे निसर्गाचे च अत्यंत महत्वाचे व अत्यावश्यक घटक आहेत समाज सुव्यवस्थीत चालविण्यासाठी या दोहोंची नितांत आवश्यकता आहे. व्यक्तींच्या सर्वांगीन विकासात स्त्री आणि पुरूषाचा समान हक्क समान वाटा व समान सहभाग आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क सनदेत सर्वांनाचा समान अधिकार दिलेले आहेत उच्च दर्जाचे स्वातंत्र्य जीवन जगण्यासाठी व सामाजीक उन्नती साधण्याकरिता स्त्री पुरूषांना समान हक्क आहेत. १८/१२/१९७९ रोजी मानवी हक्कांना युनोची परवानगी मिळाली व प्रत्यक्ष कार्यवाही ८/९/१९८० पासुन सुरू झाली .मानवी हक्कात महिला विषयी एकूण ३० कलमे नमूद आहेत. त्यात महिलांच्या १६ क्षेत्राचा विचार केलेला आहे या महिला हक्कांना अनुसरूनच भारतात महिला आयोग कायदा १९९० मंजूर करण्यात आला महिलांमध्ये सामाजिक आर्थिक व राजकिय विकास घडवून आणणे तसेच त्यांना सार्वजनिक न्याय मिळवून देणे हा उद्देश यामागे आहे. महिलांचे हक्क पुरूषांच्या हक्कापासून वेगळे करू शकत नाहीत मात्र महिलांच्या समाजातील असलेल्या दुय्यम स्थान गंभीर समस्या सन्मानाचा अभाव व गौण स्थानामुळेच महिलांसाठी स्वतंत्र हक्क सांगितले आहेत

भारतीय समाजात महिलांना पूर्वीपासून दुय्यम स्थान असल्यामुळे त्यांच्या सामाजिक समाज उन्नतीसाठी महिलांचा सहभाग त्यांचा मान सन्मान त्यांचे औदर्य यांचा हक्क या सर्व गोष्टींची जोपासना होणे गरजेचे आहे. हे मर्म जाणल्यामुळेच जीवनात मान सन्मान हक्क इत्यादी गोष्टींना तिलांजलिच मिळालेली होती विविध धर्मातील विचारवंतानी तसेच समाज सुधारकांनी महिलांच्या शिक्षण मुलभुत हक्क समाजातील सहभाग यावर वारंवार लेखन करून त्यांच्यासाठी महत्वाचे कार्य केलेले आहे.

समस्या :— भारतात परंपरागतरित्या स्त्रियांना गौण स्थान प्राप्त झालेले होते पुरूषप्रधान संस्कृतीमुळे त्यात आणखीनच भर पडली त्याचा परिणाम अनेक वर्ष स्त्रियांना भोगावा लागलेला आहे मात्र १९ व्या शतकात स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव समाजसुधारक व ब्रिटिशांना झाली त्यात लोकहितवादी बाळशास्त्री जांभेकर, गो.ग. आगरकर,न्या.रानडे,म.जोतिबा फुले,म.गांधी यांचा प्रामुख्याने समावेश होतो इंग्रजी पाश्चात्य असल्यामुळे स्वातंत्र्य व समता यांची ओळख होऊ लागली तसेच या शिक्षण पध्दतीमुळे उदार जिवन पध्दती स्त्रि शिक्षण, सतीप्रथा, केशवपन, बालविवाह, विधवांचा प्रश्न, पडदापध्दती , हुंडा पध्दती, देवदासी प्रथा, कन्यावध या व इतर अनेक प्रश्नांची मांडणी भारतीयोसमोर आली.

पितृसत्ताक पध्दतीमुळे मुलींना दुय्यम स्थान पुरूषांवर निर्धारित परोपजीवी पुरूषांच्या नियमनाखाली आधी आणल्या होती मात्र समाज सुधारकांच्या प्रयत्नाने या दुष्ट प्रवृत्ती विरूध्द आवाज उठविला गेला व अनेक कायदे आणून दुष्ट प्रवृत्तीना आळा घालन्याचे महत्वपुर्ण कार्य या लोकांनी केलेले दिसुन येते त्याच बरोबर न्या रानडे राजाराम मोहनराय म.जोतिबा फुले डॉ. आंबेडकर म.गांधी महर्षी कर्वे या व इतर अनेक समाज सुधारकांच्या साहित्यामुळे स्त्रीयांवरिल अत्याचार व समस्या विरूध्द...... निर्मीती करून त्या विरोधात आवाज उठविण्याचे महत्वपुर्ण कार्य त्यांनी केलेले दिसुन येते मात्र तो प्रकार आजही स्वातंत्र्योत्तर काळातील भारतात दिसून येवो त्याची आकडेवारी पुढील प्रमाणे

**भारतातील स्त्रीयांवरिल हिंसाचार गून्हे**

**Crime in India 2003**

| क्र | गुन्हे | १९९८ | १९९९ | २००० |
|---|---|---|---|---|
| १ | बलात्कार | १५१५१ | १५४६५ | १६४९६ |
| २ | अपहरण | १६३५१ | १५९६२ | ४५७७८ |
| ३ | विणयभंग | ३०९५९ | ३२३११ | ३२९४० |
| ४ | हुंडा | ३५७८ | ३०६४ | २४७६ |

वरील आकडेवारी वरून स्त्रीयांवरिल होणा—या अत्याचारात वारंवार वाढ होत गेलेली दिसते.

ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC


स्त्रियांचे मानवी हक्क संरक्षण व्यवस्था

स्त्रियांसंबधीच्या हक्काचे जतन करणा—या अनेक तरतूदी भारतीय राज्य घटनेत केल्या असल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष फायदा स्त्रियांना वास्तविक किती प्रमाणात मिळतो हे पहाने महत्वाचे आहे. स्त्रियांच्या हक्कासंबधी भारतीय राज्य घटनेत असलेल्या तरतुदी पुढील प्रमाणे

१ स्त्रियांचे हक्क — भारतीय संविधान

**Human Rights Indian Conctitution**

भारतीय घटनेने स्त्री पुरूषांना समान हक्क प्रदान केलेले आहेत तसेच स्त्रियांवरील शोषनाला आळा बसविन्याकरिता देखील विविध तरतुदी केलेल्या दिसतात त्या पुढील प्रमाणे

**कलम १४** — या कलमान्वये सर्वांना समान समजन्यात यावे या तत्वाला मुठमाती देऊ नये कायद्याने संरक्षणाची हमी द्यावी लिंग भेदावर आधारीत भेदभाव मान्य करू नयेत अशा प्रकारे स्पष्टीकरन या कलमात करण्यात आलेले आहे.

**कलम १५**— या कलमान्वये असे मांडलेले आहे कि,घटक राज्यांने त्यांच्या नागरिकांत धर्म, वंश, जात, लिंग, व जन्म स्थान या आधारे भेद करू नये.

**कलम १६(१)१६(२)**

या कलमानुसार घटकराज्यातील व कामाच्या ठिकाणी कोणत्याही स्वरूपाच्या व विशेषत: लिंगभेदावर आधारीत विभेदिकरणार थारा देऊ नये असे सुचित करण्यात आलेले आहे.

**कलम ३८(अ)** भारतीय संविधान या विचारावर भर देते कि, घटकराज्यांने अशी धोरणे आखावित कि ज्यामुळे स्त्री पुरूष नागरिकांना जीवनावश्यक साधनांचा योग्य व समान पुरवठा केला जाईल

**कलम ३९(ब)** हे कलम समान कामासाठी समान वेतन या तत्वाची खात्री देते मात्र काहि क्षेत्रात या कलमाचे सर्रास उल्लंघन केले जाते एकाच कामाकरिता पुरूषांना स्त्रीयांपेक्षा जास्त मजुरी/मोबदला दिला जातो.

**कलम ३६(क)** या कलमान्वये घटकराज्यांनी स्त्री पुरूष अशा दोन्ही कामगारांच्या आरोग्याचे सरंक्षण करावे मुलांना शिवी गाळ होणार नाही हे पहावे नागरिकांच्या त्यांच्या वयानुसार आर्थिक गरज

म्हणून व्यवस्था करण्यास मान्यता द्यावी वा काणत्याही नागरिकांवर विशिष्ट व्यवसाय करण्याची जबरदस्ती करू नये अशा सुचना करण्यात आलेल्या आहेत

**कलम ५१अ (क)** या कलमान्वये भारतीय संविधान या विचारांवर भर देते कि, कोणत्याही भारतीय नागरिकांनी स्त्रियांची अ प्रतिष्ठा,अपमान होईल असे वर्णन करू नये

अशा रितीने भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना अनेक हक्क प्रदान केले असले तरी अनेक स्त्रियांना त्या हक्काची माहिती व जाणीव नाही. या बाबतीत एम.जे.ॲन्टनी यांचे मत अत्यंत महत्वाचे ठरते ते म्हणतात पाश्चात्य जगातील स्त्रियांना काहि मुलभूत हक्क (उदा. मतदानाचा हक्क) प्राप्त करण्यासाठी शेकडो वर्ष लढा द्यावा लागला ते हक्क भारतीय स्त्रियांना पुरूषांबरोबर घटनेच्या प्रारंभापासूनच देण्यात आलेले होते.

स्त्रियांवरिल अन्याय अत्याचारांसंबधी कायद्यात तरतुदी –

कलम १४ – सर्व समान (धर्म जाती लिंग वंश)

कलम १५

कलम १६

कलम १६(१) व १६(२)

कलम ३९(अ)

कलम ३९(ब) समान वेतन समान हक्क

कलम ३९(क)

कलम ५१अ(क) भारतीय नागरिकांनी स्त्रियांची अप्रतिष्ठा अपमान होईल असे वर्तन करू नये

**महिला विषक (विश्लेषण–प्रस्तावना)**

**घटनात्मक तरतुदी**

कलम १४– कायद्यापुढे समता व कायद्याचे समान संरक्षण

कलम १५(३)–राज्य महिला व बालकासाठी विशेष तरतुदी करू शकते

कलम २१– कायद्याने प्रस्तापित केलेल्या प्रक्रियेशिवाय व्यक्तीच्या ..... व स्वातंज्यांच्या हक्काचा संकोच करता येणार नाही

कलम २२ – मानवाचा वापर अथवा वेठाबेगारीस प्रतिबंध

कलम ३९ – स्त्रि पुरूष दोघांना समान कामासाठी समान वेतन

महिलांशी सबंधीत कायदे आणि मानव अधिकारांचे रक्षण –

१) हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६
२) धर्मांतराने व्यक्ती विवीह विच्छेद कायदा १८६६
३) भारतीय घटस्फोट कायदा १८६९
४) भारतीय ख्रीस्ती विवाह कायदा १८७१
५) आनंद विवाह कायदा १९२९
६) वैद्यकिय गर्भपात कायदा १९२९
७) बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९(२००६)
८) पारली विवाह व घटस्फोट कायदा १९३६
९) आर्य विवाह विधिवन कायदा १९३७
१०) वेतन प्रदान कायदा १९४८ किमान वेतन कायदा १९४८ समान वेतन कायदा १९७६
११) कारखाने कायदा १९४८, खान कायदा १९५१,करार मंजूर (नियोजन व निर्मूलन) कायदा .........
१२) राज्य कामगार विमा कायदा १९५१
१३) शेती मळा लागवड कामगार कायदा १९५१
१४) विशेष विवाह कायदा १९५४
१५) नागरि अधिकाराच्या संरक्षणासंबधीचा कायदा १९५५
१६) हिंदू विवाह कायदा १९५५
१७) अनैतीक (देह) व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६
१८) हिंदू उत्तरधिकार (वारस) कायदा १९५६
१९) हिंदू अज्ञानतत्व व पालकत्व कायदा १९५६

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

स्त्रियांवरील अत्याचार/अन्यायाचे निवारण होऊन त्यांचा विकास व्हावा या करिता केंद्र व राज्य शासनाने नविन धोरणे ठरविली , नवे कायदे केले या काद्याची चांगल्या प्रकारे व परिनामकारक रितीने अंमलबजावणी व्हावी महिलांचा सामाजीक दर्जा उंचाऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या करिता महा.शासनाच्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे केली हा आयोग एक स्वायत्त संस्था असून या आयोगाचे कार्यकक्षा पुढील प्रमाणे

१) महिलांच्या संरक्षणात्मक कायद्याचा भंग झाल्यास योग्य त्या न्यायधिकाराकडे तक्रार दाखल करणे न्यायालये लोकन्यायालयामध्ये उपस्थित राहून मते मांडणे

२) गरिब पिढीत स्त्रियांना त्यांच्यावर होणा—या अत्याचारा विरूध्द लढा द्याता यावा यासाठी मोफत सल्ला व मार्गदर्शन पुरविणे
३) स्त्रि अत्याचाराच्या खटल्यावर लक्ष ठेऊन त्यांची चौकशी करणे
४) स्त्रियांना विविध उद्योग धंद्याच्या ठिकाणी होणारे आगार , शैक्षणीक समस्या ,कामाच्या ठिकाणी होणार लैंगिक छळ व इतर समस्यांना अभ्यास करून महिला विषयक धोरण आखन्यासाठी राज्य शासनास मदत करणे सल्ला देणे व मार्गदर्शन करणे इत्यादी कार्य आयोगाला करावी लागतात

………….. निर्मुलन करणे हे आयोगाचे प्रथम कार्य आहे त्यामुळे शोसन,बळजबरी,विनयभंगाच्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन आयोग पोलिस संबंधीत अधिकारी किंवा शासन यांना त्वरित कारवाई करायला भाग पाडते आयोगाच्या कार्यालयात मालमत्तेची प्रकरणे, हुंडयासाठी छळ, विवाह संबधी समस्या हुंडाबळी तक्रारी इ. तक्रारिंची नोंद केली जाते

स्त्रियांवरील अत्याचाराच्या प्रकरणात आयोत कोणतीही कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यापुर्वी गरजू महिलांचे समुपदेशन करते त्या करीता आयोगाच्या भुवईच्या कार्यालयात १९९५ पासून समुपदेशन व मोफत कायदा सल्ला केंद्र सुरू केले आहे.
आयोगाने सर्व जिल्हा परिषदा नगर पालिका व स्थानिक यंत्रनांना स्वंयसेवी संस्थांच्या मदतीने महिला व बाल विकास खात्याकडुन मिळणा—या आर्थिक सहाय्याने समुपदेशन केले सुरू करण्यास सांगितले आहे.

महिलांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करण्यासाठी आयोग स्वयसेवी संस्थाबरोबर शिबीरे आयोजीत करणे आयोग काहि मुद्या बांबत विशेष सतर्क असते जसे प्रसुतिपुर्व चिकित्सा पध्दती (गैरवापराचे नियम व प्रतिबंध ) कायदा १९९४ आणि प्रसार कायद्यामधील........ सादरीकरणा बाबत संवेदनशिलता इ.

महिलांच्या समस्या विषयी आयोग विविध संशोधन कार्य हाती घेते शिबीराचे आयोजन करावे तसेच स्वयंसेवी संस्था बरोबर या प्रश्नांबाबत समन्वय साधते आयोग आणि स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय रहाण्यासाठी टिगणी एक स्पार्क या नावान इंग्रजी व मराठी त्रैमासिक माहिती पत्रक प्रकाशीत करते

आढावा :– हुंडाबळी , बलत्कार कौटुंबीक न्यायालयात रेंगाळुन राहिलेले खटले सोडविणे व महिलांसाठी असलेल्या कायद्यात तरतुदी सुचविले व यासाठी राज्य आयोगाने कायदे तज्ञांची एक समिती स्थापिली आहे महा. राज्य महिला आयोगाने काद्यासाठी काहि तरतुदी सुचविल्या आहेत आयोगाच्या तज्ञ समितीने महिलांच्या संरक्षण व कल्याणाच्या दृष्टिने महाराष्ट्र महिला सरंक्षण कायदा १९९४ या कायद्याचा मसुदा तयार करत आहे तसेच आयोगाने कौटुबीक न्यायालये मुंबई आणि बृहनमुंबई कायदे विशयक मदत व सल्ला केंद्र आणि न्याय संस्थांच्या सहकार्याने महिला लोक अदालतीची स्थापना केली.

**राष्ट्रीय महिला आयोग १९९२ (National commission for women 1992)**

भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाची वैधानीक स्थापना १९९२ साली केली महिला अत्याचारा विरूध्द कायद्याने पुर्नमुल्यांकन करून विशिष्ट वैयक्तीक तक्रारी हस्तक्षेप करणे हे महिला आयोगाचे मुलभुत कार्य मानन्यात आले स्त्रियांच्या संदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत भास सरकारला राष्ट्रीय महिला आयोगाशी सल्ला मसलत करणे बंधन कारक असते राष्ट्रीय महिला आयोगा प्रमाणेच प्रत्येक प्रान्त सरकारणे त्यांच्या त्यांच्या प्रांतात स्वतंत्र महिला आयोग स्थापन करण्याचा सल्ला केंद्र सरकारने सर्व प्रातिंक सरकारांना दिली होता सद्या स्थितीत उपलब्ध माहिती नुसार २००२ पर्यंत भारतातील केवळ १३ राज्यात स्वतंत्र राज्य महिला आयोगची स्थापना करण्यात आली होती.

**राष्ट्रीय महिला आयोगाची कार्य (Function of the national commission for women )**

१) संविधान व इतर कायद्यात स्त्रियांसाठी केलेल्या सुरक्षा तरतुदीनुसार संदर्भातील बाबींचा शोध घेऊन त्याचे परिक्षण करण्याचे कार्य आयोगाचे आहे दृ

२) स्त्रिया संबधीच्या सुरक्षा कवचाची परिणामकारक अंमलबजावणी करूण स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक त्या शिफारशी करणे

३) स्त्रियांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणे अंमलबजावणी न करणे धोरणात्मक निर्णयांना संमती न देणे या बाबतच्या तक्रारीरींचे

दखल घेण्याचे कार्य आयोगाचे आहे ४) विषमतेतून निर्माण होणा—या समस्या किंवा स्त्रियांविरूध्द अत्याचार यांचे विशेष अध्ययन करणे किंवा त्या संदर्भात चौकशी करणे त्यातील अडचणी दूर करणे

५) स्त्रियांचे प्रतिनिधीत्व सर्व क्षेत्रात वाढविण्यासाठी योग्य मार्ग सुचविणारे सुचणात्मक व शैक्षणीक संशोधन करणे तसेच स्त्रियांच्या प्रगतिशील अडथळे शोधून ते दूर करणे

६) सर्व साधारणपणे स्त्रियांवर अन्याय होईल अशा घटनेच्या विरोधातील खटले चालविण्याकरिता आवश्यक निधी संबधितांना उपलब्ध करून देण्याचे कार्य इ. आयोग करते

७) तुरूंग सुधारगृह स्त्रियांच्या संस्था किंवा इतर जागा कि जेथे स्त्रियांना बंदिस्त करून ठेवले जाते अशा ठिकाणचे परिक्षण करणे अत्यावश्यक असेले तर संबंधिक अधिका—यांबरोबर उपाय योजनात्मक कृती करण्यास सांगण्याचे कार्यहि महिला आयोगाला पार पाडावे लागते .